महाराष्ट्र टाइम्स

**Maharashtra Times**, 12 Dec 2016

# ‘येऊर’ बनतेय तळीरामांचा अड्डा

## रात्री उशिरापर्यंत चालणाऱ्या पार्ट्यांनी आदिवासी हैराण

**म. टा. प्रतिनिधी, ठाणे**

उपवनसह शहरातील लॉज आणि अनधिकृत बारवर पालिकेने हातोडा चालविल्यानंतर 'विस्थापित' झालेल्या तळीरामांनी थेट येऊरकडे मोर्चा वळवला आहे. त्यामुळे एकीकडे पालिकेच्या पाडकामानंतर ओस पडलेल्या उपवनकडून हाकेच्या अंतरावर असलेल्या येऊरमध्ये मात्र तळीरामांचा धिंगाणा वाढला आहे. त्यातच सध्याच्या गुलाबी थंडीमुळे तळीरामांचे सेलिब्रेशन वाढतच आहे. मद्याचे घोट रिचविण्यासाठी येणाऱ्या तळीरामांच्या गोंगाटामुळे येथील आदिवासींना होणारा त्रासही वाढला आहे. त्यामुळेच पालिकेने येऊरमधील अनधिकृत धंद्यांकडे लक्ष केंद्रीत करण्याची मागणी स्थानिक करत आहेत.

**शनिवार-रविवार या वीकेंडचा मुहूर्त साधत हुल्लडबाज गर्दीचा येऊरमध्ये धुडगूस सुरू असतो. त्यातच येऊरच्या मुख्य प्रवेशद्वाराकडे वनविभागाकडून कोणालाही अडवले जात नसल्याने प्रत्येकासाठी येऊर म्हणजे मोकळे रान झालेले आहे.**

- अपूर्वा आगवण, क्रायसेस, सामाजिक संस्था, येऊर




डिसेंबर महिना सुरू होताच पार्ट्यांचे वेध लागल्याने ठाणेकरांसह मुंबईकरांची पावलेही येऊरच्या दिशेने वळू लागतात. मात्र मागील काही दिवसांपासून ठाण्यात पालिका आयुक्त संजीव जयस्वाल यांनी अनैतिक धंद्यांसह अनधिकृत बांधकामांवर सुरू केलेल्या धडक कारवाईमुळे ऐन सुगीच्या हंगामात बार बंद झाले. त्यामध्ये अनेक बार जमीनदोस्त करण्यात आले अथवा त्यांचे दर्शनी बांधकाम पाडण्यात आले. त्यामुळे त्यांच्याकडील ग्राहकांची संख्या रोडावली. त्यामुळे पाडाकामाच्या गोंधळात विस्थापित झालेल्या तळीरामांनी येऊर परिसरातील हॉटेल, रेस्टॉरंट, हुक्का पार्लर आणि ओपन बारकडे मोर्चा वळवला आहे. ठाणे पालिकेने बुलडोझर चालविल्यानंतर उजाड झालेला उपवन अथवा सर्व्हिस रोडच्या पूर्णपणे विरुद्ध चित्र सध्या येऊरमध्ये दिसून येत आहे.

सायंकाळी सूर्य अस्ताला गेल्यानंतर तळीरामांचे जथ्थेच्या जथ्थे येऊरच्या दिशेने जातात. त्यातच येऊर भागात असणाऱ्या ओपन बार, हुक्का पार्लर आणि रेस्टॉरंट आदींमध्ये रात्री उशिरापर्यंत मोठमोठ्या आवाजात गाणी लावून धांगडधिंगा कायम असतो. काही हुक्का पार्लर्समध्ये विशिष्ट दिवशी बँडचे आयोजन केले जात असल्याने त्याठिकाणी उशिरापर्यंत तळीरामांसाठी 'संगीतरजनी' असते. मात्र ज्या पोलिसांना येऊरच्या पायथ्याकडील सत्यमच्या कुंटणखान्याचा थांगपत्ता लागलेला नव्हता, असे पोलिस खाते येऊरमधील गैरप्रकारांवर कुठून कारवाई करणार असा, संतप्त सवाल येऊरमधील स्थानिक आदिवासींनी केला.